# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

Web:www.dhepune.gov.in
E-mail : bed.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्रमांक उशिसं/२०१६/शिक्षण शुल्क/बीएड दिनांक २८.०४.२०१६

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय** : राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे अंतरिम शुल्क प्रमाणित करणेबाबत.

**संदर्भ** : शासन पत्र क्र.शुल्क ५२१५/प्र.क्र.२८०/मशि-२, दिनांक १५.०९.२०१५
२. संचालनालयाचे समक्रमांकाचे दिनांक ११.०४.२०१६ चे पत्र

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये आपल्या विभागातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अंतरीम शुल्क मान्यतेचा प्रस्ताव दिनांक ३०.०४.२०१६ पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यांत आले होते. सदर प्रस्ताव सादर करण्यांकरीता मुदतवाढ देण्यांत येत असून सदरचे प्रस्ताव दिनांक १०.०५.२०१६ पर्यंत सादर करण्यांबाबत आपल्यास्तरावरुन कळविण्यांत यावे. यानंतर कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यांत येणार नाही याचीही नोंद घेण्याबाबत कळवावे.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

**राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे अंतरिम शुल्क प्रमाणित करणेबाबत.**

शासन पत्र क्रमांक शुल्क ५२१५/प्र.क्र.२८०/मशि-२, दिनांक १५.०९.२०१५ नुसार शिक्षण शुल्क समितीच्या सदर निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता राज्यातील विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना, त्यांच्या सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी आकारलेल्या मान्यताप्राप्त शुल्कामध्ये ५ टक्के वाढ करुन निचित होणाऱ्या रकमेपैकी निम्मे शुल्क शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष) व निम्मे शुल्क शिक्षणशास्त्र (द्वितीय वर्ष) अभ्यासक्रमासाठी अंतरिम शुल्क म्हणून आकारण्यास मान्यता दिलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षाचे शुल्क शिक्षण शुल्क समितीचे सदस्य सचिव तथा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

तरी राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी अंतरीम शुल्क मान्यतेचा प्रस्ताव दिनांक १०.०५.२०१६ पर्यंत सादर करावा. प्रस्ताव सादर करतांना यापूर्वी शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल्या शुल्काची मान्यता पत्राची प्रतही सादर करावा.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १